**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail-** pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- ३१/०३/२०१८

## मनमाड शहरातील ए.टी.एम. फोडणारे सराईत गुन्हेगार २४ तासात जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

---

मनमाड शहरात दिनांक २९/०३/२०१८ रोजी दुपारचे सुमारास कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी स्टेट बॅक ऑफ इंडिया, मनमाड शाखेचे दोन ए.टी.एम. व सी.डी.एम. मशिनची लोखंडी रॉडचे सहाय्याने तोडफोड करून सुमारे २९ हजार ५०० रूपये रोख रक्कम चोरी करून चोरून नेली होती. सदर बाबत **मनमाड शहर पोलीस ठाणेस । गुन्हा रजि. नंबर ६१/२०१८ भादवि कलम ३८०,४२७,३४** प्रमाणे तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री.संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो** यांचे मार्गदर्शनाखाली **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला व सदर गुन्हयाचे घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून सदर ए.टी.एम. मधील सी.सी.टी.व्ही. फुटेज प्राप्त केले, त्यात दोन संशयीत इसम मिळुन आल्याने त्यांचे वर्णनावरून कसोशिने शोध घेणेबाबत स्थागुशाचे पथकास सुचना दिल्या. त्याप्रमाणे दिनांक ३०/०३/२०१८ रोजी स्थागुशाचे पथक मनमाड शहर तसेच लगतचे तालुक्यांमध्ये वरील गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेत असतांना, पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त माहितीप्रमाणे मनमाड शहरातील गुरूव्दारा मध्ये बाहेरील राज्यातील काही इसम वास्तव्यास होते बाबत समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने मनमाड गुरूव्दारा परिसरात सापळा रचुन संशयीत **इसम नामे १) हरप्रितसिंग दलजितसिंग अठवाल**, वय २८, रा. चिठीगाव, ता.लांबडा, जि. जालंदर, राज्य पंजाब, **२) हरमेलसिंग संतोखसिंग तालीवाल,** वय २८, रा. बिलीचाव, ता.शाकोट, जि.जालंदर राज्य पंजाब यांना शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमांची झडती घेतली असता त्यांचे कब्जात रोख रूपये १४,८००/- तसेच एक एअर पिस्टल, एक सॅमसंग जे २ मोबाईल असा **एकुण १८,३००/- रू.चा मुद्देमाल** मिळुन आला. सदर आरोपीतांना विश्वासात घेवुन जप्त मुद्देमालाबाबत विचारपुस केली असता त्यांनी मनमाड शहरातील एस.बी.आय. बॅंकेचे ए.टी.एम मशिन फोडले असल्याची कबुली दिली आहे.

ताब्यात घेतलेले वरील दोन्ही आरोपी हे सराईत असुन पंजाब राज्यातील रहिवासी आहे, ते गेले काही दिवसांपासुन नांदेड जिल्हयातील गुरूव्दारा येथे सेवा करण्याचे बहाण्याने राहत होते. मागील ०७ दिवसांपासुन ते मनमाड शहरातील गुरूव्दारा येथे वास्तव्यास होते, दरम्यान त्यांनी मनमाड शहरातील विविध ठिकाणांवरील ए.टी. एम. मशिनवर पाळत ठेवुन गुरूवार दिनांक २९ मार्च रोजी बॅंकेस सुट्टी तसेच वर्दळ कमी असल्याचा फायदा घेवुन दुपारचे सुमारास मनमाड शहरातील स्टेट बॅंकेचे ए.टी.एम. मशिन फोडुन चोरी केली आहे, तसेच बाजुस असलेले सी.डी.एम. मशिन फोडण्याचा प्रयत्न केला परंतु ते आरोपीतांना फोडता आले नाही, सदर सी.डी.एम. मशिनमध्ये सुमारे २२ लाख रूपये कॅश असल्याचे बॅंकेचे व्यवस्थापक यांनी सांगितले होते. सदर गुन्हयात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने अत्यंत चिकाटीने आरोपींचा मागोवा घेवुन **२४ तासांचे आत सदर गुन्हा उघडकीस** आणलेला आहे. सदर आरोपी हे सराईत असुन त्यांचे कब्जात मिळुन आलेली एअरपिस्टल व साहित्य साधने यावरून त्यांनी अजुन काही गुन्हे केलेले असल्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, पोउनि **श्री. स्वप्निल नाईक**, सपोउनि शांताराम लहाणे, अरूण पगारे, पोकॉ गणेश नरोटे, हरीष आव्हाड, प्रविण काकड, भाउसाहेब टिळे, संदिप लगड अशांचे पथकाने सदर गुन्हा उघडकीस आणुन कामगिरी केली आहे.